विदर्भ मतदार
बहुजनांचा बुलंद आवाज

# श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन साजरा



**विदर्भ मतदार प्रतिनिधी**

**महागांवः** श्री शिवाजी शिक्षण संस्था पुसद द्वारा संचालित श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालय सवना येथे दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत महल्ले होते. प्रमुख अतिथी म्हणून इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. पी. पी. जैस्वाल, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. नासिर शेख, प्रा. भावना तायडे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिल खाडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. भावना तायडे यांनी केले. राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. नासिर शेख यांनी २५ जानेवारी ह्या दिवशी निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. संपूर्ण भारतीय लोकांना निवडणूक आयोगाने मतदान करण्यासाठी मतदानाचा अधिकार दिला. लोकशाहीला जिवंत ठेवण्यासाठी प्रत्येक भारतीय लोकांनि निवडणुकीच्या माध्यमातून आपल्या देशात आपणास योग्य नेता निवडून आणता येतो. याकरीता आपण सर्वांनी आपल्याला मिळालेल्या मतदानाच्या अधिकाराचा उपभोग घेतला पाहिजे. आणि दर ५ वर्षांनी होणाऱ्या लोकसभा, विधानसभा आणि ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती तसेच राज्यातील नगर परिषद, महानगर पालिका आणि इतर निवडणुकीत आपण सर्वांनी मतदान केले पाहिजे. जेणे करुन आपल्या देशात लोकशाही शासन प्रणाली यशस्वी होईल आणि ती सशक्त होण्यासाठी प्रयत्न होईल. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीना मतदान करण्यासाठी शपथ देण्यात आली आहे. जात, धर्म, लिंग, भाषा या आधारवर मतदान न करता उच्च विद्याविभूषित व्यक्ती आपल्या देशात निवडून दिल्या गेला तर निश्चितच लोकशाही सुदृढ व सशक्त होईल. तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत महल्ले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रत्येक १८ वर्ष पूर्ण झालेल्या मतदार मग तो स्त्रीअसो की पुरुष असो यांनी आपल्या मतदानाच्या अधिकाराचा हक्क निवडणुकीच्या वेळी मतदान करून बजावला पाहिजे. त्या शिवाय लोकशाही मजबूत व सशक्त होणार नाही. कारण एक एक मताचे मूल्य हे निवडून येण्यासाठी उमेदवार व्यक्तीस महत्त्वाचे ठरते. यावेळी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. तसेच शिक्षकेतर कर्मचारी भगवान सरसमकर, विनोद देशमुख, अमित देशमुख , डी. डी. लडके, एन . भडंगे उपस्थित होते आणि महाविद्यालयातील प्रा. डॉ. राजरत्न कांबळे, प्रा. अनिल खाडे, प्रा. शिलानंद कांबळे, प्रा. नरवाडे, डॉ. नितीन हुंबे, प्रा. कु. पल्लवी नरवाडे, प्रा. बी. एम. मोरे, प्रा. निशा चव्हाण, प्रा. भगत मॅडम व सहकारी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

31 Jan 2026 - Page 3 | www.vidarbhamatadar.in
Powered by | softisky.com

अहवाल -

श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालय सवना येथे दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय मतदार दिन

हा कार्यक्रम महाविद्यालयात पार पडला या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविध्यालायाचे प्राचार्य डॉ .हेमंत महल्ले होते ,

तर प्रमुख अतिथी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा .नासीर शेख ,इंग्रजी विभाग प्रमुख प्रा ,प्रदीप जयस्वाल , प्रा कु ,

भावना तायडे ,प्रा कु. पल्लवी नरवाडे उपस्थित होते . राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा .नासीर शेख यांनी आजच्या

काळात प्रत्येक भारतीय नागरिकांनी आपल्याला असलेल्या मतदानाचा हक्क बाजवणे आवश्यक आहे . त्याशिवाय

लोकशाही यशस्वी होणार नाही .जनतेला योग्य असा नेता देशासाठी निवडून देण्याचा अधिकार लोकशाही शासन प्रणाली

मध्ये मिळाला असून या अधिकाराचा उपयोग आपण प्रत्येक निवडणुकीत केला पाहिजे . त्याचसोबत विध्यार्थ्यांना मतदान करण्याची शपथ दिली .

राज्यशास्त्र विभाग प्रमुख | प्राचार्य